


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड-महाराष्ट्र मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ । वर्ष ६ वे । अंक ४० । पाने ४ । पान १ । किंमत ३ रूपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com










# शिंदेंचा शरद पवारांना मोठा धक्का

## बड्या नेत्यानं सोडली साथ, शिवसेनेत मोठा पक्षप्रवेश

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला राज्यात मोठं यश मिळालं होतं, मात्र हे यश महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीमध्ये टिकवता आलं नाही. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा मोठा पराभव झाला. राज्यात महायुतीचं सरकार आलं. दरम्यान विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीला गळती लागल्याचं पहायला मिळत आहे. महाविकास आघाडीमधील अनेक दिग्गज नेत्यांनी महायुतीमध्ये प्रवेश केला आहे . ही पक्षाला लागलेली गळती रोखण्याचं मोठं आव्हान महाविकास आघाडीसमोर आहे. याचा सर्वाधिक फटका हा शिवसेना ठाकरे गटाला आणि राष्ट्रवादी शरद पवार गटला बसला आहे. दरम्यान आता राजकीय वर्तुळातून आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. एकीकडे काही दिवसांपूर्वी राज्यात ऑपरेशन टायगर आणि ऑपरेशन तुतारीची जोरदार चर्चा सुरू होती. याच चर्चे दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठा धक्का दिला आहे. माजी राज्य मंत्री आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी आमदार विनायकराव जाधव पाटील यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे, त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेनेत प्रवेश केला. दरम्यान विनायकराव जाधव यांच्यासोबतच बीआरएसचे माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे यांनी देखील शिवसेनेत प्रवेश केला आहे.



### ● शिंदे काय म्हणाले ?

**शिवसेना चांदा ते बांधा पर्यंत पोहचली आहे. आपल्याला संघटना मजबूत करायची आहे. मी सामान्य कार्यकर्ता आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, लेक लाडकी, पीक विमा , ज्येष्ठांसाठी योजना अशा अनेक योजना आपण आणल्या. जे बोलतो ते करतो, त्यामुळे लोक विश्वास ठेवतात. कोनीही मायका लाल आला तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. शिवसेनेचा भगवा डौलाने फडकत राहील, घर तिथे शिवसैनिक अभियान राबवा, एसआयआर यादीकडे लक्ष द्या, शिवसेनेत जो काम करेल तोच पुढे जाईल, असं यावेळी एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. दरम्यान दुसरीकडे आतापासूनच शिवसेनेकडून आगामी निवडणुकांची तयारी सुरू करण्यात आल्याचं पहायला मिळत आहे.**

# तीन पर्याय असतानाही भाजपमध्येच का?

## राघव चड्डा यांनी स्पष्टच सांगितले; आपवर गंभीर आरोप



**नवी दिल्ली**

राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी आम आदमी पक्ष सोडला आणि आपल्या सात सहकारी खासदारांच्या पाठिंब्यासह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. यानंतर त्यांनी एक नवीन व्हिडीओ प्रसिद्ध केला आहे. या व्हिडीओमध्ये राघव चड्ढा यांनी स्पष्ट केले आहे की, गेल्या तीन दिवसांत त्यांना असंख्य संदेश प्राप्त झाले आहेत. काही लोकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या, तर काही लोकांनी त्यांच्या या निर्णयामागील कारणे जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. याचपार्श्वभूमीवर राघव चड्ढा यांनी व्हिडीओ बनवत आप पक्ष सोडण्याव्यतिरिक्त त्यांच्याकडे प्रत्यक्षात आणखी दोन पर्याय उपलब्ध होते, असा खुलासा केला आहे. आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम हँडलवरून व्हिडीओ पोस्ट करताना राघव चड्ढा यांनी सांगितले की, राजकारणात येण्यापूर्वी मी एक चार्टर्ड अकाउंटंट होतो आणि माझी कारकीर्द अत्यंत यशस्वी होती. राजकारणाच्या क्षेत्रात उतरण्यासाठी मला ही कारकीर्द मागे सोडावी लागली. केवळ स्वतःची संपत्ती किंवा नफा कमावण्यासाठी मी राजकारणात आलो नाही. मी सुरुवातीला एका राजकीय पक्षाचा म्हणजे आम आदमी पक्षाचा संस्थापक सदस्य बनलो. त्यानंतर गेल्या १५ वर्षांपासून पक्षासाठी कठोर परिश्रम केले. परंतु आम आदमी पक्ष हा आता पूर्वीसारखा पक्ष राहिलेला नाही. ▶▶ उर्वरित पान २ वर

# पुन्हा एकाचा खून !

## पत्नीच्या आक्षेपार्ह फोटोवरून मित्रांनीच केली मित्राची हत्या ; होमगार्डही आरोपी

### ● आरोपी १२ तासात जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील बेलुरा गावात एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना उघडकीस आली आहे. १९ वर्षीय तरुण सुमित सुशील ऊर्फ सुशांत गवते याची त्याच्याच मित्रांनी संगनमत करून हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणातील एक मुख्य आरोपी होमगार्ड असल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



नेमकी घटना काय घडली? ही घटना २६ एप्रिल रोजी रात्री साडेसात ते साडेआठच्या दरम्यान घडली. फिर्यादी शहादेव गवते हे मोटारसायकलवरून जात असताना नारायणगड परिसरातील हॅलिपॅडजवळून ओरडण्याचा आवाज आला. तेथे पाहिले असता, ▶▶ उर्वरित पान २ वर

# अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवले ; गुन्हा दाखल

**केज । प्रतिनिधी**



सोळा वर्षीय अल्पवयीन मुलीला गावातीलच एका तरुणाने फूस लावून पळवल्याची घटना एका गावात घडली असून केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, २३ एप्रिल रोजी संबंधित मुलीचे आई-वडील हे नातेवाईकांच्या कार्यक्रमानिमित्त नेकनूर येथे गेले होते. रात्री घरी परतल्यानंतर त्यांना त्यांची मुलगी घरात नसल्याचे निदर्शनास आले.त्यांनी तात्काळ नातेवाईक व परिसरात मुलीचा शोध घेतला, मात्र ती कुठेही आढळून आली नाही. दरम्यान, मुलीच्या भावाच्या मोबाईलवर अंबाजोगाई तालुक्यातील एका गावातील ग्रामपंचायत सदस्याचा फोन आला. त्यामध्ये बेपत्ता मुलगी एका तरुणासोबत अंबाजोगाई तालुक्यातील त्याच्या आजोळी गेल्याची माहिती देण्यात आली. यानंतर मुलीच्या वडिलांनी केज पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीनुसार, गावातीलच एका तरुणाने त्यांच्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीवरून संबंधित तरुणा विरोधात गु. र. नं. २४३/२०२६ अन्वये भा. न्या. सं. कलम १३७ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम करीत आहेत.

# धर्मादाय विभागात कार्यरत चौधरी यांच्याविरुद्ध कथित लैंगिक छळ व गैरवर्तनाच्या तक्रारीमुळे प्रशासनात मोठी खळबळ

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील धर्मादाय विभागात कार्यरत प्रदीप मगनलाल चौधरी यांच्याविरुद्ध कथित लैंगिक छळ व गैरवर्तनाच्या तक्रारीमुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. संबंधित प्रकरणी एका महिलेने छेडछाड, अपमानास्पद वागणूक तसेच कामासाठी येणाऱ्या महिलांकडे अयोग्य नजरेने पाहणे, मानसिक दबाव टाकणे आणि पैशांची मागणी केल्याचे गंभीर आरोप केले आहेत. या तक्रारीची दखल घेत महाराष्ट्र शासन स्तरावर हालचालींना वेग आला असून, सहाय्यक सॉलिसिटर तथा उपसचिव सुजित बोरकर यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

# मोठी बातमी! नितेश राणेंना त्या प्रकरणात थेट तुरुंगवासाची शिक्षा

**मुंबई । प्रतिनिधी**

देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडलात मंत्री असलेले नितेश राणे सर्वात मोठा धक्का बसला आहे. त्यांना थेट एका महिन्याच्या कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. सोबतच या कारावासासह एक लाख रुपये दंड घेण्याचाही आदेश न्यायालयाने दिला आहे. हा निकाल म्हणजे नितेश राणे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. दुसरीकडे नितेश राणे यांच्या वकिलांनी आता समोर आलेल्या निकालाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.



न्यायालयाने नेमका काय निर्णय दिला? चिखलफेक प्रकरणात शांततेचा भंग केल्याप्रकरणी नितेश राणे यांना न्यायालयाने दोषी ठरवले आहे. याच निर्णयाअंतर्गत नितेश राणे यांना एका महिन्याच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. तसेच त्यांना एक लाखाचा दंडही भरावा लागणार आहे. कणकवलीच्या न्यायालयाने हा निकाल दिला आहे.

नेमके प्रकरण काय? एका रस्त्याच्या पाहणीप्रकरणी नितेश राणे यांनी अभियंते प्रकाश खेडेकर यांच्यावर चिखलफेक केली होती. तसेच त्यांना बांधूनही ठेवण्यात आले होते. सोबतच खेडेकर यांच्या कपड्यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

# मनसेने व्यक्त केलेली शंका खरी ठरली

## १ मे पासून रिक्षा चालकांना 'मराठी' सक्ती नाहीच ? मंत्रालयातील बैठकीनंतर सरनाईकांनी स्पष्टच सांगितलं

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा सक्तीच्या करण्याच्या निर्णयावरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १ मे महाराष्ट्र दिनापासून हा नियम लागू करण्याची घोषणा केली होती.

मात्र, या निर्णयाला रिक्षा-टॅक्सी चालक संघटनांनी तीव्र विरोध केला. तसंच शिवसेना नेते संजय निरुपम यांनी देखील या निर्णयाला विरोध केला होता. अशातच आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात रिक्षा-टॅक्सी संघटनांच्या नेत्यांसोबत बैठक आयोजित केली होती. मात्र, या बैठकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला निमंत्रण देण्यात आले नव्हते. यावरूनच राज्य सरकार मराठी सक्तीच्या निर्णयावरुन बॅकफूटवर जाण्याच्या तयारीत असल्याचे वक्तव्य मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी केलं होतं. अशातच आता मंत्रालयातील बैठक पार पडली असून बैठकीनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितलं की, आजच्या बैठकीत काहींनी राज्यात रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा सक्ती करण्याच्या निर्णयासाठी मुदतवाढ करण्याची मागणी केली आहे. काहींनी एक वर्ष, काहींनी सहा तर काहींनी तीन महिन्यांची मुदत मागितली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# एसबीआय बँकेत कॅशचा तुटवडा कायमच

## खातेदारांना आवश्यक रक्कम मिळत नसल्याने कामे खोळंबली

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून एसबीआय बँकेत कॅशचा तुटवडा कायम असून, आज मादळमोही येथील शाखेत अनेक खातेदारांना आवश्यक रक्कम मिळत नसल्याने कर्मचारी अन२ खातेदारांमध्ये वाद निर्माण होत आहेत. तर अनेक दिवसांपासून रक्कम मिळत नसल्याने कामे खोळंबली आहेत. यामुळे ही समस्या सोडविण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. एसबीआय बँकेत कॅशचा तुटवडा ही बऱ्याच दिवसांपासून सुरू असून, रिझर्व्ह बँके तर्फे कॅश मिळत नसल्याचे बँकेकडून सांगितले जात आहे. यामुळे जिल्ह्यातील एसबीआयच्या शाखेत १०,२० ▶▶ उर्वरित पान २ वर






◆ संपादकीय...

## सगुण–निर्गुण: शब्दगुरु

नेणीवेचा बर्फ वितळतो. मग शब्द प्रवाही होतात. आठव्या प्रहरात अंधारात मंत्र ऐकू येतो. वर्षानुवर्ष. सत नाम वाहे गुरु. नांदेड. नंदीतट. नंदिग्राम. सचखंड. गोदाकाठ. संतश्रेष्ठ दासगणु महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आमची वास्तू. वाड्यामागे दोनशे पावलांवर बंदाघाट. चारशे पावलांवर नगीना घाट. हजार पावलांवर पवित्र गुरुद्वारा. गुरु गोविंद सिंह महाराजांचे समाधीस्थळ. प्रेमळ, श्रद्धाळू पंजाबी भक्तांच्या अलोट गर्दीने वेढलेलं. सतत मंत्र. सत नाम वाहेगुरू. ईश्वर सत्य आहे. शाश्वत आहे. सचखंड म्हणजे सत्याची भूमी. माधो दास हे वैरागी पुरुष. गुरुगोविंद सिंह यांचे शिष्य बनले. नामकरण केलं बंदा सिंह बहादुर. म्हणून बंदाघाट. एका व्यापाऱ्याने दिलेलं रत्न गुरुगोविंद सिंग महाराजांनी नदीत फेकून दिलं. व्यापारी नाराज झाल्यावर त्याला तो नगीना नदीत शोधायला सांगितला. तिथे त्याला अनेक रत्नं दिसली. अहंकार दूर करणारा नगीना म्हणून नगीना घाट. काय योगायोग. नामदेव महाराज तिकडे नदीत परीस फेकतात. लोककथा मूल्यांची रुजवण करतात म्हणून त्या जगभर मोलाच्या मानल्या जातात. प्रतिकात्मक अर्थात जीवन रहस्यांचा शोध घेता येतो. ते पंजाबमध्ये वीस वर्षं राहतात. भगत नामदेव बाबा होतात. त्यांचे एकसष्ट शब्द (पदं) गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट केले जातात. गुरु गोविंद सिंह गोदेगाठी येतात. इथेच देह ठेवतात. इथेच सांगतात, आता मानवी गुरू असणार नाही. नाम जप करा. कष्टाने अर्थार्जन करा. आपल्या कमाईतला काही अंश गरजूंना द्या. समता आणि बंधुभाव, स्त्री पुरुष समानता शिकवणारा आणि विकारांवर नियंत्रण करायला लावणारा हा ग्रंथ. सर्व समावेशकता अशी की शीख गुरूंसोबत कबीर, नामदेव, फरीद आणि रविदास महाराजांची पदं यात आहेत. एकतीस रागांमध्ये संगीतबद्ध असलेला हा ग्रंथ. सतत सबद कीर्तनातून यातील संदेश मनावर गारूड करतो. 'आसा दी वार' म्हणजे आशेचं गीत. आशेचं गीत मनात प्रज्वलित करणारा हा ग्रंथ. या ग्रंथासमोर माथा टेकवता येतो ही केवढी भाग्याची गोष्ट.

# रात्री कलिंगड खाल्ल्याने शरीरात 'विष' तयार होतं? कलिंगड खाण्याची योग्य वेळ आणि पद्धत, लगेच जाणून घ्या

उन्हाळ्याचा तडाखा वाढला की, रस्त्यारस्त्यावर रंगाने लालचुटूक आणि चवीला गोड अशा कलिंगडांच्या राशी दिसू लागतात. घामामुळे शरीरातील पाणी कमी झाल्यावर, थकवा घालवण्यासाठी गारवा देणारं कलिंगड खाण्यासारखं दुसरं सुख नाही.

९२% पाणी असलेलं हे फळ फक्त तहानच भागवत नाही, तर त्यात असलेले व्हिटॅमिन्स आणि अँटी-ऑक्सिडंट्स आपल्याला उन्हाळ्यातील आजारांपासून वाचवतात.

पण, कधी तुम्ही विचार केला आहे का की, हेच अमृतासारखं फळ चुकीच्या वेळी खाल्ल्यास तुमच्या शरीरासाठी 'विष' ठरू शकतं? मग आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की कलिंगड खाण्याची योग्य वेळ काय?



अनेकदा आपण रात्री जेवण झाल्यावर किंवा अगदी झोपण्यापूर्वी कलिंगड खातो. पण आयुर्वेदापासून ते आधुनिक विज्ञानापर्यंत सर्वच ठिकाणी कलिंगड खाण्याच्या वेळेबाबत काही कडक नियम सांगण्यात आले आहेत. कलिंगड कधी खावं आणि कधी टाळावं, हे जर तुम्हाला माहीत नसेल, तर आरोग्याला फायदे होण्याऐवजी गंभीर समस्यांना सामोरे जावे लागू शकते. चला तर मग, या रसाळ फळाचा आनंद घेण्याची योग्य वेळ नेमकी कोणती, हे सविस्तर जाणून घेऊया.

रात्री कलिंगड खाणे धोक्याचे का?

अनेकांना रात्रीच्या जेवणानंतर 'डेझर्ट' म्हणून कलिंगड खायची सवय असते. मात्र, आरोग्य तज्ज्ञांच्या मते हे पूर्णपणे चुकीचे आहे. यामागे तीन प्रमुख कारणे आहेत:

पचन क्रियेवर परिणाम:रात्रीच्या वेळी आपली पचन संस्था मंदावलेली असते. कलिंगडामध्ये साखर आणि पाण्याचे प्रमाण जास्त असते. रात्री कलिंगड खाल्ल्याने अन्नाचे पचन नीट होत नाही, ज्यामुळे 'ॲसिड रिफ्लक्स' किंवा पोट फुगण्याचा त्रास होऊ शकतो.

वजनात वाढ: कलिंगडामध्ये नैसर्गिक साखर असते. रात्रीच्या वेळी आपली शारीरिक हालचाल शून्य असते, त्यामुळे ही साखर ऊर्जेत रूपांतरित न होता चरबीच्या स्वरूपात साठू शकते. त्यामुळे ज्यांना वजन कमी करायचे आहे, त्यांनी रात्री कलिंगड खाणे टाळावे.

झोपेत अडथळा: कलिंगड हे Natural Diuretic आहे. म्हणजेच ते खाल्ल्यावर लघवीचे प्रमाण वाढते. जर तुम्ही झोपण्यापूर्वी कलिंगड खाल्ले, तर तुम्हाला रात्री वारंवार लघवीसाठी उठावे लागेल, ज्यामुळे तुमची गाढ झोप मोड होईल आणि दुसऱ्या दिवशी थकवा जाणवेल.

मग कलिंगड खाण्याची चांगली वेळ कोणती?

जर तुम्हाला कलिंगडाचे पूर्ण फायदे हवे असतील, तर ते खाण्याची सर्वात उत्तम वेळ म्हणजे सकाळी १० ते दुपारी १ च्या दरम्यान.

जेव्हा सूर्याची उष्णता वाढू लागते, तेव्हा शरीर थंड ठेवण्यासाठी कलिंगड उत्तम काम करते.

सकाळी नाश्ता केल्यानंतर १-२ तासांनी कलिंगड खाणे पचनासाठी सोपे जाते.

जिम किंवा वर्कआऊटनंतर शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स भरून काढण्यासाठी कलिंगड हा एक उत्तम पोस्ट-वर्कआऊट नाश्ता ठरू शकतो.

पावसाळ्यात किंवा थंडीत: कलिंगडाचा स्वभाव थंड असतो. त्यामुळे ढगाळ हवामानात किंवा थंडीत कलिंगड खाल्ल्याने सर्दी, खोकला किंवा सायनसचा त्रास बळावू शकतो.

कधी खाऊ नये?

१. जेवणासोबत टाळा: जेवताना किंवा जेवण झाल्याबरोबर लगेच कलिंगड खाऊ नका. यामुळे पचन क्रियेत अडथळा निर्माण होतो. फळं नेहमी स्वतंत्रपणे खावीत.

२. पावसाळ्यात किंवा थंडीत: कलिंगडाचा स्वभाव थंड असतो. त्यामुळे ढगाळ हवामानात किंवा थंडीत कलिंगड खाल्ल्याने सर्दी, खोकला किंवा सायनसचा त्रास बळावू शकतो.

३. रिकाम्या पोटी: काहींना रिकाम्या पोटी कलिंगड खाल्ल्याने पोटात गॅस किंवा ॲसिडिटी जाणवू शकते.

कलिंगड खाताना 'या' चुका टाळा

कलिंगड खाल्ल्यानंतर लगेच पाणी पिऊ नका. यात आधीच भरपूर पाणी असल्याने लगेच वरून पाणी पिल्याने पचनसंस्थेतील पाचक रसांवर परिणाम होऊन अपचन होऊ शकते.

कलिंगड खाल्ल्यानंतर किमान १ तास दूध पिणे टाळा. दूध आणि कलिंगड हे 'विरुद्ध आहार' मानले जातात, ज्यामुळे त्वचेचे विकार किंवा पोटाचे गंभीर आजार होऊ शकतात.

◆ पान ९ वरून पुढे...

### तीन पर्याय....

राघव चड्ढा यांनी सांगितले की, आम आदमी पक्षाचे स्वरूप बदलले आहे. पक्षांतर्गत सदस्यांना आता राज्यसभेत बोलण्यापासून रोखले जाते आणि त्यांना त्यांचे काम पार पाडण्यामध्ये जाणूनबुजून अडथळे निर्माण केले जातात. हा पक्ष आता केवळ काही मोजक्याच भ्रष्ट आणि तडजोड केलेल्या व्यक्तींच्या नियंत्रणाखालील एक संघटना बनून राहिला आहे. अशा व्यक्ती ज्यांचे उद्दिष्ट देशसेवा करणे हे नसून केवळ स्वतःचे वैयक्तिक स्वार्थ साधणे हेच आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून मला स्वतःबद्दल असे वाटत होते की, मी चुकीच्या पक्षात एक योग्य माणूस आहे. हे सर्व पाहिल्यानंतर माझ्यासमोर तीन पर्याय उरले होते. पहिला पर्याय म्हणजे मी राजकारण सोडून देणे, दुसरा पर्याय म्हणजे याच पक्षात राहून परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणे आणि तिसरा पर्याय म्हणजे दुसऱ्या एखाद्या राजकीय पक्षात सामील होऊन माझ्या अनुभवाचा आणि ऊर्जेचा वापर करून रचनात्मक राजकारण करणे. त्यामुळे केवळ एक किंवा दोन नाही, तर एकूण सात संसद सदस्यांनी (खासदारांनी) मिळून 'आप' (--झ) पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. राघव चड्ढा यांनी सांगितले की, एखादी व्यक्ती कदाचित चुकीची असू शकते किंवा दोन व्यक्तीही चुकीच्या असू शकतात, परंतु एकाच वेळी सात व्यक्ती चुकीच्या असणे हे मात्र पूर्णपणे अशक्य आहे. जर एखाद्या पक्षात कामाचे वातावरण अत्यंत दूषित झाले असेल तर अशा वातावरणात काम करणे किती कठीण होऊन बसते, याची तुम्ही कल्पना करू शकता. अशा नाजूक वळणावर योग्य तो निर्णय घेऊन त्या परिस्थितीतून बाहेर पडणे भागच पडते. त्यामुळे आम्ही सर्वांनी मिळून एका नवीन राजकीय पक्षात सामील होण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, अनेक लोकांनी राघव चड्ढा यांना विचारले होते की, ते पूर्वीप्रमाणेच लोकांचे प्रश्न आणि समस्या मांडणे पुढेही चालू ठेवतील का? यावर त्यांनी लोकांना आश्वासन दिले, मी संसदेमध्ये तुमचे प्रश्न पूर्वीप्रमाणेच जोमाने आणि निष्ठेने मांडणे यापुढेही चालूच ठेवीन.

### पुन्हा एकाचा...

काही जणांनी सुमितला पकडून ठेवले होते आणि एक आरोपी त्याच्यावर वार करत होता. घटनेनंतर आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना नागरिकांनी एका आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. हत्येचं कारण काय?- पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींपैकी एकाच्या पत्नीचे आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर दाखविल्याच्या संशयावरून हा वाद निर्माण झाला होता. या वादातूनच आरोपींनी पूर्वनियोजित कट रचून सुमितची हत्या केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात रितेश सतीश बहिर,रुस्तुम गोवर्धन गवते,ज्ञानेश्वर दत्ता लाटे (पकडला),सूरज मच्छिंद्र नागरगोजे यातील एक आरोपी होमगार्ड असल्यामुळे प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. पोलिसांची कारवाई- शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी ज्ञानेश्वर दत्ता लाटे या आरोपीला अटक केली. इतर आरोपी फरार असून पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली आहे. शिरूर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेने मोहीम राबवत बारा तासाच्या आत गुन्हेगारांना जेरबंद करण्यात यश मिळवला आहे. रुस्तुम गोवर्धन गवते वय २३ वर्ष रा. बेलुरा, सुरज मच्छिंद्र नागरगोजे वय २० वर्ष रा. लिंबा ता. शिरूर कासार यांना जेरबंद केले. मात्र उर्वरित दोन आरोपी विधी संघर्षग्रस्त आहेत.या घटनेनंतर बेलुरा गावात तणावपूर्ण शांतता पसरली आहे. आरोपींना जेरबंद करण्यासाठी राबविलेली मोहीम पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. शिवाजी बंटेवाड , सपोनी प्रवीण जाधव,पोउपनि. खांडखोळे,पोह उबाळे, सानप, बहिरवाळ, कानडे यांनी पार पाडली.

### धर्मादाय विभागात...

प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे प्राथमिक चौकशीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालय महाराष्ट्र यांनीही तातडीने स्वतंत्र चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. तक्रारीनुसार, संबंधित अधिकाऱ्यांकडून महिलांशी गैरवर्तन, अपमानास्पद भाषा वापरणे, तसेच विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांवर अनुचित दबाव आणण्याचे प्रकार सातत्याने घडत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या गंभीर आरोपांमुळे धर्मादाय विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सामाजिक वर्तुळात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणात केवळ वर्तनाचीच नव्हे तर संबंधित अधिकाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांची आणि मालमत्तेचीही चौकशी करण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करून अनधिकृत संपत्ती जमा केली आहे का, याचीही तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. नागरिकांकडून या प्रकरणात निष्पक्ष, पारदर्शक आणि वेळेत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. तसेच पीडित महिलेला न्याय मिळावा आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने कडक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या या प्रकरणातील सत्यता चौकशीअंती स्पष्ट होणार असून, प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मोठी बातमी! ....

धरून त्यांच्याशी बोलताना असभ्य वर्तन करण्यात आले होते. या प्रकरणाचा व्हिडीओहीदेखील तेव्हा चांगलाच व्हायरल झाला होता. हे प्रकरण समोर आल्यानंत राणे यांच्यावर चांगलीच टीका करण्यात आली होती. नितेश राणे या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागणार आहेत. तशी माहिती राणेंच्या वकिलांनी दिली आहे. वकिलाने नेमकं काय सांगितलं आहे? नितेश राणे यांच्याविरोधात ३५३ कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यासोबतच इतरही काही महत्त्वाच्या आरोपांतून नितेश राणे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. परंतु न्यायालयाने भारतीय दंडविधान कलम ५०४ म्हणजेच सार्वजनिक शांततेचा भंग होणे, शांतता भंग व्हावी यासाठी कोणालातरी उद्युक्त करणे या कलमाअंतर्गत नितेश राणे यांना दोषी ठरवण्यात आले आहे. त्यांना एक महिन्याचा कारावास, एक लाख रुपये दंड अशी शिक्षा त्यांना ठोठावण्यात आली आहे, असे वकिलने सांगितले आहे. दरम्यान, आता मुंबई उच्च न्यायालयात नेमके काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### १ मे पासून रिक्षा....

यावर बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल, रिक्षा, टॅक्सी चालवायची असेल तर मराठी यायलाच पाहिजे, याला सगळ्यांनी सकारात्मकता दाखवली. प्रत्येकाची भूमिका आम्ही ऐकून घेतली. सर्वांनी आमच्या रोजी रोटी बंद नाही झाली पाहिजे, अशी भूमिका असेल तर आम्हाला हा निर्णय मान्य असल्याचं सांगितलं. त्यानंतर त्यांनी मुदत मागितली. शिवाय मुदत मागताना त्यांनी जबाबदारी देखील घेतली आहे. रिक्षा टॅक्सी युनियनचे नेते आमच्या भूमिकेशी सहमत आहेत, असं सरनाईकांनी सांगितलं. तर त्यांनी मुदत मागितली असली तरी अद्याप आम्ही ती दिलेली नाही. पण त्यांच्या मागण्यांशी सकारात्मक भूमिका घेऊ. त्यांनी मुदत मागितली आहे आमचीही द्यायची तयारी आहे. फक्त आता किती वेळ द्यायचा किती काळासाठी द्यायचा याचा निर्णय, उद्या आरटीओ अधिकाऱ्यांशी बैठक बोलावली आहे. या बैठकीनंतर निर्णय जाहीर करू की किती मुदतवाढ द्यायची, असंही सरनाईकांनी स्पष्ट केलं. शिवाय त्यांनी मुदत वाढवून मागितली आणि त्यांचं समाधान करण्यासाठी मुदतवाढ देणार असं अजिबात नाही. मुदतवाढ द्यायला तयार आहे पण त्यांची मुजोरी चालणार नाही, महाराष्ट्रात हिंदीतच बोलू असली मुजोरी चालमार नाही, असा इशाराही सरनाईकांनी यावेळी दिला. मात्र, सरनाईक यांनी मुदतवाढीच्या भूमिकेसाठी ते सकारात्मक असल्याचं सांगितल्यामुळे मनसेने जी शंका व्यक्त केली होती. ती आता खरी होणार की काय अशा चर्चांना उधाण आलं आहे.

### एसबीआय बँकेत....

हजारांवर खाते धारकांची बोळवण करण्यात येत आहे. असाच प्रकार आज मादळमोही एसबीआय बँकेच्या शाखेत सुरू असून, एका खातेदाराला ४० हजारांची गरज होती मात्र बँक कर्मचाऱ्यांनी तेवढी रक्कम देण्यास असमर्थता दर्शवली आहे. केवळ १० हजार रुपये देऊ शकतोत असे सांगितले आहे. यामुळे त्या खातेदाराच्या कामाचा खोळंबा झाला असल्याची माहिती दिली. तसेच ही समस्या सोडवून बँकेला कॅश उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ....

व जुजगव्हाण ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

### आंबेडकरी विचारधारा....

जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित मौजे कुमसी ता.जि. बीड या गावी रिपाइं नामफलकाच्या उदघाटनाप्रसंगी केले.
अंधश्रद्धा, रुढी व परंपराच्या खाईत खितपत पडलेल्या उपेक्षित समूहातील समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या संघर्ष नायक विश्ववंदनिय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या दिवशीच बाबासाहेबांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाच्या शाखेची स्थापना करणे हेच खऱ्या अर्थाने बाबासाहेबांना अभिवादन. यावेळी प्रा. फुलचंद लुचारे, बाळासाहेब ठोंबरे, रामेश्वर खळगे, संदेश मस्के, मिठू वाघमारे, ऋषी धुताडमल, कैलास जोगदंडसह रिपाइं कार्यकर्ते व कुमशी गावातील सर्व समाज बांधव उपस्थित होते.

### बीड कृषी प्रदर्शनाची....

मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करते केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन ओंकार साखर कारखाना सीड्स फर्टीलायझर डीलर इनपुट असोसिएशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात द्वारे तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहे, एकदिवसीय पशुप्रदर्शन तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहे विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा या शेतक यांचा गौरव करण्यात येणार आहे. या प्रदर्शनाचा बीड शहरासह जिल्ह्यातील शेतकर्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे,स्वागताध्यक्ष दिलीपराव गोरे , निमंत्रक ,कार्याध्यक्ष कृषीभूषण शिवराम घोडके , स्वागत समिती प्रमुख गणेश बजगुडे, चंद्रकांत नवले , निमंत्रक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे ,स्वागत समिती प्रमुख रमेश सानप, संभाजी जाधव,पुरस्कार समिती प्रमुख सुभाषराव सपकाळ , मान्यवर स्वागत समिती प्रमुख बंडू जटाळ, ॲड. गणेश करांडे ,नियोजन समिती प्रमुख कैलास रकटे, राहुल टेकाळे, गणेश राऊत,व्यवस्थापन समिती प्रमुख शिवाजीराव जाधव, अशोक कागदे, बलभीमराव बोरवडे प्रसिद्धी समिती प्रमुख मंजीत शेख, सुभाष चौरे,उत्तम हजारे,गणेश सावत,संपादक संजय मालानी, संपादक कामरान शेख, संपादक जालिंदर धांडे,चर्चासत्र समितीप्रमुख जुबेर पठाण, धनंजय गुंदेकर पशुप्रदर्शन समिती डॉ.संभाजी जाधव यांनी केले आहे.

### पंडित दीनदयाल....

उपलब्ध करून देता येतील, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. लघुउद्योग, स्वयंरोजगार, बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण, तसेच ग्रामीण भागातील उत्पन्नवाढीच्या संधी यावर सखोल चर्चा झाली.
याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देताना प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, जल जीवन मिशन, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), तसेच पशुसंवर्धन व शेतीपूरक व्यवसायांसाठी असलेल्या अनुदान योजनांचा लाभ कसा घ्यावा याचे मार्गदर्शन करण्यात आले. शेतकरी, महिला बचत गट, बेरोजगार युवक यांना प्रत्यक्ष अर्ज प्रक्रिया, पात्रता निकष आणि आवश्यक कागदपत्रांबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली.
कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, जि. प. सदस्य भारत काळे, शांताराम डोरले, शरदजी इंगळे, बी एल ए वन आणि केज विधानसभा विस्तारक शांतीनाथजी डोरले भाजपा जिल्हा सचिव भाजपाचे युवा नेते सुनील मिसाळ, बालाघाट मंडळ अध्यक्ष अशोक रसाळ अमोल वडतीले (जिल्हा संयोजक), महादेव नागरगोजे (तालुका सरचिटणीस, बीड सौ. भाग्यश्री ढाकणे , ब्रह्मनाथ डोईफोडे, सरपंच सोमनाथ तांदळे, उपसरपंच चंद्रशेखर कवडे, सेवानंद कदम, सदाशिव खंदारे, अशोक शिंदे, तोंडे पिंटू, भटे बापूराव, अमोल तागड, प्रदीप वाघमारे, रावसाहेब डोईफोडे, सोशल मीडियाचे राजू शहाणे तसेच ग्रामीण), जिया शेख (अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष, नेकनूर मंडळ) आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.
कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि योजनांविषयीची जिज्ञासा. ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या योजना थेट समजावून सांगून त्यांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न या शिबिरातून करण्यात आला.
या यशस्वी उपक्रमाचे श्रेय जि. प. सदस्य राणा डोईफोडे यांच्या प्रभावी नियोजनाला व पुढाकाराला जाते. त्यांच्या प्रयत्नांमुळे येळंबघाट परिसरातील नागरिकांना शासनाच्या योजनांची प्रत्यक्ष माहिती मिळून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा महत्त्वपूर्ण मार्ग खुला झाला आहे.
नेकनूर मंडळातील बुथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते

### शिवद्रोहींवर कारवाईची....

सरकार प्रायोजित आहे का? असा थेट प्रश्न डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आणि सरकारचा निषेध नोंदविला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पहिले बिर्याणी, मग कलिंगड खाल्ले..., एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू; आख्खं कुटुंब एकाचवेळी संपलं, नेमकं रहस्य काय?



**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. विषबाधेमुळे एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे. मुंबईतील पायधूनी परिसरातील ही घटना घडली आहे. मृतांमध्ये १३ आणि १६ वर्षीय मुलीचा देखील समावेश आहे.

मुंबई पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, फूड पॉइझनिंगमुळे एका कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला आहे. कुटुंबाने त्यांच्या इतर नातेवाईकांसह रात्री साडेदहा वाजता जेवण केलं होतं. दुसऱ्याच दिवशी त्यांना उलटी आणि जुलाबाचा त्रास सुरू झाला. फॅमिली डॉक्टरकडे गेला असता त्याने जेजे रुग्णालयात सल्ला दिला.

मृत्यूपूर्वी कुटुंबातील एका व्यक्तीने पोलिसांना दिलेल्या जबाबात सांगितले की, त्यांनी सर्वांनी एकत्रितपणे आधी बिर्याणी खाल्ली आणि त्यानंतर कलिंगड खाल्ले होते. या प्रकरणात पोलिसांच्या मते, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. मृतांची ओळख अब्दुल्ला डोकाडिया (४०), नसरीन डोकाडिया (३५) आणि त्यांच्या मुली आयशा (१६) व झैनब (१३) अशी झाली आहे.

पायधुनी परिसरातील घाटी गल्ली येथील मुघल बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या डोकाडिया कुटुंबीयांनी शनिवारी रात्री कलिंगड खाल्ले. कलिंगड खाल्ल्यानंतर चौघांनाही उलट्या, चक्कर आणि पोटदुखी यांसारखी लक्षणे जाणवू लागली. त्यानंतर रविवारी त्यांची प्रकृती अधिकच खालावली. डोकाडिया यांच्या दोन्ही मुली बेशुद्धावस्थेत आढळल्या.यानंतर चौघांनाही तात्काळ जेजे रुग्णालयात नेण्यात आले. रुग्णालयात नेल्यानंतर एका मुलीला डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्यानंतर काही तासांनी दुसऱ्या मुलीचाही मृत्यू झाला. दुसऱ्या मुलीच्या मृत्यूनंतर काही वेळात पालकांचाही मृत्यू झाला. चारही मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले असून शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण समोर येईल. घाटकोपरच्या नित्यानंद नगरमध्ये दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली. आरोपीला घाटकोपर पोलिसांनी अटक केली आहे. घाटकोपरच्या नित्यानंद नगरमध्ये बाजूलाच राहणाऱ्या नराधमाने अंगणात खेळणाऱ्या मुलींना घरात नेऊन अत्याचार केला. घटनेची माहिती मिळताच विभागातील संघटनानी संताप व्यक्त केला. पोलिसांना हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडून मारहाण झाल्याचंही समोर आलं आहे. या प्रकरणी चार जणांनावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# विद्यार्थ्यांचे शुल्क सहा टक्के व्याजासह परत करण्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालय यांच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे विद्यार्थ्यांची बाजू न्याय्य ठरवत संबंधित महाविद्यालयास विद्यार्थ्यांकडून वसूल केलेले शुल्क सहा टक्के व्याजासह परत करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले आहेत. विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पुणे येथील आय,एल,एस, विधि महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांकडून करण्यात आलेल्या बेकायदेशीर शुल्क वसुलीप्रकरणी राज्य शासनाने ही भूमिका घेतली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, पुणे येथील अशासकीय अनुदानित महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून अपारदर्शक पद्धतीने व बेकायदेशीर शुल्क आकारणी करण्यात आल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उच्च शिक्षण विभागाने सह संचालक (उच्च शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समितीची स्थापना करून सखोल चौकशी केली. या चौकशीअंती सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, संबंधित महाविद्यालयाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ (७) च्या तरतुदींचे उल्लंघन करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांची पूर्वमान्यता न घेता शैक्षणिक वर्ष २०२०–२१, २०२१–२२ व २०२४–२५ दरम्यान विद्यार्थ्यांकडून अनधिकृत शुल्क वसूल केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. १७ विविध शीर्षकांखाली एकूण १,०४,८६३/– रुपये इतकी रक्कम बेकायदेशीररित्या वसूल करण्यात आल्याचे आढळून आले आहे.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयाद्वारे संबंधित महाविद्यालयास ही रक्कम फी भरल्याच्या दिनांकापासून सहा टक्के व्याजदराने संबंधित विद्यार्थ्यांना परत करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले. राज्यातील इतर महाविद्यालयांमध्येही विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी होत असल्यास त्याची शहानिशा करून अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण आणि महाविद्यालयांमधील शुल्क निर्धारण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.



*बीडः सूर्य घर मोफत वीज अशी सरकारची योजना सुरू आहे आणि या योजनेपासून बऱ्याच लोकांनी आपल्या घरावरती सोलर बसवले आहेत व वीजबिलापासून सुटकरा मिळेल पण सध्या सरकारने या सोलर वरती टॅक्स लावण्याचा विचार केला आहे आणि तो लवकर अमलात येईल पण हे कितपत योग्य आहे या सोलार वीजनिर्मितीपासून बरेचसे फायदे होत आहेत तशी जनता वीज वापरापासून संदर्भात जागरूक होत आहे होणारे प्रदूषण पण या सरकारला फक्त कुठल्या ना कुठल्या माध्यमातून जनतेकडून टॅक्स वसूल करायचा आहे यामुळे ज्या लोकांनी सोलर बसवला आहे त्यांच्यामध्ये खूप मोठी निराशा व सरकार विषय नाराजी दिसून येत आहे सोलर ग्राहकांना टॅक्स लावणे हे चुकीचे धोरण आहे सर्वसामान्य लोकांनी बँकेचे लोन करून सोलार आपल्या घरावरती बसवले आहेत*

# मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक

## उष्णतेच्या लाटेबाबत जनजागृती करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

## संपर्क समन्वय योजना तयार करुन आपत्ती निवारणासाठी सज्ज राहण्याचे निर्देश

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

आपत्ती व्यवस्थापनाचा मान्सूनपूर्व आढावा घेत असतांना सद्यस्थितीत येऊ घातलेल्या उष्णतेच्या लाटेचा प्रतिकार कसा करावा, याबाबत यंत्रणांनी जनजागृती करावी. आरोग्य विभागाने सर्वस्तरावरील आरोग्य संस्थांमध्ये शीत कक्ष उभारुन सज्जता ठेवावी,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिली. तसेच संपर्क व समन्वयाची योजना तयार ठेवून संभाव्य आपत्तीच्या निवारणासाठी सर्व विभागांनी सज्ज रहावे,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी आज सर्व यंत्रणांना दिले.



जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची आज मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक पार पडली. जिल्हा नियोजन सभागृहात ही बैठक पार पडली. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या सह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अति. पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी सामान्य शाखा संगिता राठोड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती म्हस्के तसेच सर्व संबंधित यंत्रणा प्रमुख उपस्थित होते. बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात गोदावरी नदी काठावर निळ्या रेषेखाली येणारी पैठण तालुक्यात १८ तर वैजापूर तालुक्यात १७ व गंगापूर तालुक्यात ८ अशी एकूण ४३ गावे आहेत. पैठण तालुक्यात पैठण शहर, कावसान, दादेगाव– जहांगीर, नायगाव, वडवळी, नवगाव व वैजापूर तालुक्यातील डोणगाव, बाबतारा, लाखगंगा, नांदूरढोक, बाभूळगाव, बाजाठाण या गावांना पुरामुळे वेढा पडतो. तर जिल्ह्यात छत्रपती संभाजीनगर तालुक्यात १६, पैठण तालुक्यात १५, फुलंब्री तालुक्यात ७, वैजापूर तालुक्यात ३१, गंगापूर तालुक्यात २६, खुलताबाद तालुक्यात ६, सिल्लोड तालुक्यात १०, कन्नड तालुक्यात ४८ तर सोयगाव तालुक्यात ६ अशी एकूण १६५ गावे ही पूरप्रवण आहेत. जिल्ह्यात कायगाव ता. गंगापूर येथे छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर रस्ता व पैठण येथून शेवगाव कडे जाणारा रस्ता असे गोदावरी नदीवरील पुल पुराने बाधीत होतात. तसेच जिल्ह्यात एकूण ६३ लहान मोठे पूल आहेत. त्या पुलांची तपासणी करावी. पुरामुळे वा अन्य काही कारणामुळे पुलावरुन वाहतुक होणे शक्य नसल्यास पर्यायी वाहतुक मार्ग आत्ताच शोधून ठेवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.

# मुंबई इंडियन्सच्या अडचणीत वाढ! फॉर्मात असलेल्या खेळाडूची स्पर्धेतून माघार, फ्रँचायझीने त्याच्या जागी कुणाला घेतले ?

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सच्या अडचणीत वाढ झालेली पाहायला मिळत आहे. मुंबई इंडियन्सने आयपीएलच्या या पर्वात ७ सामन्यांत फक्त दोन विजय मिळवले आहेत आणि ते गुणतालिकेत ९व्या क्रमांकावर आहे.

रोहित शर्मा अजूनही पूर्णपणे तंदुरुस्त झालेला नाही आणि त्यात त्यांचा आणखी एक स्टार खेळाडू संपूर्ण लीगमधून बाहेर झाला आहे. चळींलहशश्रश्र डरपींपशी याला दुखापतीमुळे स्पर्धेतूनच माघार घ्यावी लागली आहे.



मुंबई इंडियन्सने दक्षिण आफ्रिकेचा डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराज याला सँटनरचा बदली खेळाडू म्हणून करारबद्ध केले आहे. सँटनरने मुंबईसाठी या पर्वात ५ विकेट्स घेतल्या आहेत. सँटनरला मागील सामन्यात डाव्या खांद्याला दुखापत झाली होती आणि त्याने मैदान सोडले होते. महाराज हा दक्षिण आफ्रिकेच्या सर्व प्रकारच्या क्रिकेटमधील सर्वात अनुभवी फिरकी गोलंदाजांपैकी एक आहे. अचूक नियंत्रण आणि प्रतिस्पर्ध्यांवर सातत्याने दबाव निर्माण करण्याची क्षमता त्याच्याकडे आहे.२०१६ मध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण केल्यापासून दक्षिण आफ्रिका संघात एक महत्त्वाचा घटक राहिला आहे. एकही आंतरराष्ट्रीय ट्वेंटी–२० सामना न खेळताही त्याची दक्षिण आफ्रिकेच्या २०२१ च्या ट्वेंटी–२० वर्ल्ड कप संघात निवड झाली होती; त्याने श्रीलंकेविरुद्ध कर्णधार म्हणून ट्वेंटी–२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले आणि आपल्या पहिल्याच चेंडूवर बळी मिळवला. केशवने मागील ३० ट्वेंटी–२० सामन्यांमध्ये ३१ बळी मिळवले आहेत; यामध्ये १५ धावांत ३ बळी ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे.

केशव नुकताच न्यूझीलंडविरुद्धच्या ट्वेंटी–२० आंतरराष्ट्रीय मालिकेत खेळला होता. त्याने २०२४ मध्ये राजस्थान रॉयल्सचे प्रतिनिधित्व करत दोन आयपीएल सामने खेळले आहेत. पाचवेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सला प्ले ऑफसाठी फार मेहनत घ्यावी लागणार आहे. ते ७ सामन्यांत ४ गुण मिळवून नवव्या क्रमांकावर आहेत. उर्वरित ७ सामने जिंकल्यास ते १८ गुणांपर्यंत पोहोचू शकतात.

# राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेत सहभाग नोंदविण्याचे आवाहन

**नांदेड । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या 'ज्ञानभारतम्' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिम १६ मार्च २०२६ पासून सुरु आहे, नागरिकांकडे असलेल्या हस्तलिखितांची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲपवर अपलोड करुन राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारित होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था,संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खासगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधित संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू ही हस्तलिखिते स्वखुशीने शासनाकडे सुपूर्द करावायाची झाल्यास शासन स्वीकारणार आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच एनसीसी, एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५५७ / २०२६**

**कसुदा ढेरे वि. निल**

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

अर्जदारः **(१) कसुदा भ्र. मारूती ढेरे, वय: ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. रामनगर पो. जिरेवाडी, ता. जि. बीड २) आशा भ्र. हरिदास मोहिते, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळवाडी पोसाकत जामखेड, ता. जि. अहमदनगर. ३) लहु मारूती ढेरे (मयत) ३– अ) उषा पि. हलु ढेरे, वय: ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. रामनगर पो. जिरेवाडी, ता. जि. बीड३– ब) अनिता पि.हलु ढेरे, वयः सज्ञान धंदा : शिक्षण, रा. वरील प्रमाणे. ३– क) वनिता पि.हलु ढेरे, वयः सज्ञान, धंदा शिक्षण, रा. वरील प्रमाणे. ४) महानंदा भ्र. साहेबराव नांदे, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. कोळवाडी, ता. जि. बीड ५) कांचन भ्र. ज्ञानोबा सुरवसे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. रामनगर पो. जिरेवाडी, ता. जि. बीड**

विरूध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी **मयत नामे मारूती तात्याबा ढेरे, राहणार रामनगर जिरेवाडी, ता. जि. बीड हे दिनांक १४/०४/२०२४ रोजी रामनगर जिरेवाडी, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ हे मयताचे पती असुन अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे व अर्जदार क. ३ हा मयताचा मुलगा असुन तो मयत झालेला आहे. अर्जदार क्र. ३ (अ) ही मयताची सुन असुन अर्जदार क. ३(ब) व ३ (क) यांचे हया मयताचे नाती आहेत. अर्जदार क्र. ४ व ५ हया मयताचे मुली आहेत.

मयत नामे मारूती तात्याबा ढेरे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु **मयत मारूती तात्याबा ढेरे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०५/०५/२०२६ आहे.**

आज दिनांक २४/०४/२०२६ रोजी माझे महीने व न्यायालयाने शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ तळेकर के. व्ही.)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती वंदना व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ६२८/२०२६**

**सिध्देश्वर पि.मदन मोरे व इतर वि. निरंक**

अर्जदार – **१. सिध्देश्वर पि.मदन मोरे, वय– ४६ वर्षे, धंदा–शेती, रा.गुंधा ता.जि.बीड. २. सचिन पि. मदन मोरे, वय– ४४ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर. ३. सारिका भ्र. संतोष कौचट, वय ४० वर्षे, धंदा–घरकाम, रा. १८१८ बांदल आळी, आयसीआयसीआय बँकेच्या मागे, रांजणगाव गणपती, पुणे ता. जि. पुणे. ४. चंद्रकला भ्र. मदन मोरे, वय–६८वर्षे, धंदा–घरकाम, रा. गुंधा ता.जि.बीड** विरुध्द

गैरअर्जदार– निरंक

प्रकरण:– भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत मदन बाजीराव मोरे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत मदन बाजीराव मोरे हे दिनांक २८/१२/२०२५ रोजी राहते घरी मौजे गुंधा ता. जि. बीड मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क. ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. तसेच अर्जदार क. ४ ही मयताची पत्नी आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मयत मदन बाजीराव मोरे रा. गुंधा ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख २३/०६/२०२६.** आज दिनांक २०/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**(ॲड. एम. डी. धांडे)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

दैनिक

# मराठवाडा पत्र

मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६



## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शुक्रवार रोजी कृष्णा महाराज राऊत यांचे कीर्तन



बीड (प्रतिनिधी): विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील नवव्या पुण्यतिथी वैशाख शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. स्वरभुषण कृष्णा महाराज राऊत बेलगावकर ता.गेवराई जि.बीड यांचे शुक्रवार दिनांक १ मे २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती ▶▶ उर्वरित पान २ वर

# आ.संदिप क्षीरसागरांनी घेतला विविध विभागांचा आढावा

## मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या केल्या संबंधितांना सुचना

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघातील विविध महत्वाच्या प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी वेगवेळ्या शासकीय विभागांची सोमवारी (दि.२७) रोजी आढावा बैठका घेतल्या. यामध्ये संबंधित विभागांशी निगडीत असलेले नागरिक, शेतकरी यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सुचना संबंधित अधिकाड्यांना केल्या. सोमवार (दि.२७) रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे बीड पंचायत समिती, शिरूर कासार पंचायत समिती, जलसंधारण विभाग, जलसंपदा विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या विभागांचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न, शेतकड्यांचे प्रश्न, विकास कामांचा आढावा या बाबत चर्चा करण्यात आली. यावेळी आ.संदिप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आणि सामान्य नागरिक उपस्थित होते.



### ● पुल कम बंधाड्याच्या कामासाठी महामार्ग प्राधिकरण, जलसंपदा, जलसंधारण विभागांची संयुक्त बैठक

**बीड शहरातील बार्शी नाका येथे सुरू असलेल्या पुल कम बंधारा कामाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जलसंपदा विभाग आणि जलसंधारण विभाग या तीन विभागांची संयुक्त बैठक झाली. पुढिल येत्या काळात पाणी टंचाई होऊ नये यासाठी लवकरात लवकर पुल कम बंधाड्याचे काम पुर्ण होऊन पाणी अडविण्या बाबतच्या नियोजना संदर्भात यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. येत्या पावसाळ्यातच या ठिकाणी पाणी अडवून बीड शहर आणि परिसरातील गावांची पाणी पातळी वाढविण्याच्या अनुषंगाने ही बैठक महत्वपुर्ण ठरली आहे.**

# आंबेडकरी विचारधारा तळागाळात पोहोचविण्याचे काम रिपाइं कार्यकर्त्यांनी करावे: उदघाटकांचे आवाहन

## कुमसी येथील रिपाइं नामफलकाचे राजू जोगदंड, किसन तांगडे यांच्या हस्ते उदघाटन



### शाखा कार्यकारणी कुमसी ता.जि. बीड

**शाखाध्यक्ष सौरभ वाघमारे, उपाध्यक्ष गौतम वाघमारे, सचिव दुशांत वाघमारे, सहसचिव राहुल भिसे, संघटक रवींद्र भिसे, कोषाध्यक्ष मंगेश वाघमारे, सदस्य समाधान वाघमारे, सचिन वाघमारे, तुषार वाघमारे, नितीन वाघमारे, विकी वाघमारे.**

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र देऊन या देशातील तमाम उपेक्षित समूहातील समाज बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी लढा उभारण्याची ताकद निर्माण करून दिली. आंबेडकरांना अपेक्षित असलेली चळवळ गतिमान करण्यासाठी युवकांनी संघटित होऊन आंबेडकरी विचारधारा तळागाळात पोहोचविण्याचे काम करावे. असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सहचिटणीस राजू जोगदंड, रिपाइंचे बीड तालुकाध्यक्ष किसन तांगडे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड कृषी प्रदर्शनाची उत्सुकता शिगेला

## डोम उभारणीच्या कामाचे महंत योगीराज महाराजांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

### ६ फुटी सराडा (इगवाना) ठरणार आकर्षण

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ०१ ते ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण ( मल्टीपर्पज ग्राउंड )बीड या मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्रदर्शन जय्यत तयारी सुरू असून



शेतकऱ्यांमध्ये कृषी प्रदर्शनाची उत्सुकता शिंगेला पोहोचली आहे दि. २६ एप्रिल रविवारी रोजी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण बीड मैदानावर डोम स्ट्रक्चरच्या कामाचा शुभारंभ रामगड संस्थानाचे मठापती महंत स्वामी योगीराज महाराज व स्वागतअध्यक्ष दिलीप गोरे , कार्याध्यक्ष शिवराम घोडके यांच्या शुभ हस्ते व गणेश राऊत, रमेश सानप, कैलास रकटे, बंडू जठाळ शरद गोरे , संभाजी जाधव,ॲड. गणेश कारंडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला भव्य असे सहा डोम या ठिकाणी उभारण्यात येत असून या अनुषंगाने विविध कार्यक्रमाची रेलचेल चार दिवस चालणारा असून दिनांक १ मे रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे असल्याची माहिती रोजी कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी माहिती आहे.

### शेतकऱ्यांना दिला जाणार मोफत स्टॉल

**या कृषी प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी मोफत स्टॉल दिला जाणार असून स्वत: उत्पादित केलेल्या नाविन्यपूर्ण उद्योगाला मोफत स्टॉल दिला जाणार आहे जेणेकरून या आपल्या लघु उद्योगास चालना मिळावी या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे**

मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान ▶▶ उर्वरित पान २ वर

# पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण शिबिर उत्साहात

## शासकीय योजनांची सविस्तर माहिती, राणा डोईफोडे यांच्या पुढाकाराला प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

मौजे येळंबघाट येथे पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पर्यावरण व हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर मंडळ अध्यक्ष तथा जि. प. सदस्य राणा डोईफोडे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षण शिबिरात




शासनाच्या विविध महत्त्वाच्या योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. विशेषतः डखठ संकल्पनेद्वारे ग्रामीण युवक-युवतींना स्वावलंबनाच्या संधी कशा ▶▶ उर्वरित पान २ वर

# शिवद्रोहींवर कारवाईची मागणी

## "शिवरायांची बदनामी सरकार प्रायोजित आहे का?" जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन: डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी तथ्यहीन व ऐतिहासिक आधार नसलेली विधाने करून अवमानना करणाऱ्या बागेश्वरधामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्यावर कठोर कारवाई करावी, या प्रमुख मागणीसाठी शिवप्रेमी डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.२७) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. फडणवीस सरकारच्या कार्यकाळात बहुजन महापुरुषांची अवमानना करणाऱ्या



वाचाळवीरांच्या संख्येत वाढ झाल्याचा आरोप करत, सरकारकडून ठोस कारवाई होत नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत संबंधित वक्तव्य झाले असल्याने, ही अवमानना सरकार प्रायोजित आहे का? असा सवाल शिवप्रेमींनी उपस्थित केला.

संबंधित प्रकरणात कठोर कारवाईची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती व राज्यपाल यांना पाठविण्यात आले. नागपूर येथे भारतदुर्गा मंदिराच्या शिलान्यास कार्यक्रमात धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या वक्तव्यावरून राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. संबंधित वक्तव्य ऐतिहासिक सत्याचा विपर्यास करणारे असून शिवरायांचा अवमान करणारे आहे, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, गणेश मस्के,माजी सैनिक अशोक येडे, सय्यद सादेक,रामधन जमाले,शेख मुबीन,बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे, प्रा.डी.जी.तांदळे, डॉ. लक्ष्मण पवळ ,प्रविण पालीमकर,अशोक ढोले,शिवाजी हिंदोळे आदी सहभागी झाले होते.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांची वारंवार बदनामी होत असताना शासन निष्क्रिय का? असा सवाल उपस्थित करत ही बदनामी ▶▶ उर्वरित पान २ वर

# एकाच आठवड्यात तीन बालविवाह रोखून नवरदेवासह सात जणांवर गुन्हे दखल



## अल्पवयीन मुलींची सुटका; AHTU पथकाची धडक कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (AHTU) पथकाने प्रभावी कारवाई करत एका आठवड्यात तीन बालविवाह उधळून लावत संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी दहीफळ (ता. जि. बीड) येथे १५ वर्षीय मुलीचा बालविवाह होणार असल्याची गुप्त माहिती प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांना मिळाली. त्यानुसार –क्ढण पथकाने घटनास्थळी धाड टाकत लग्नमंडपात सापळा रचला. वेषांतर करून महिला अंमलदारांनी मुलीला ताब्यात घेतले, तर पुरुष अंमलदारांनी नवरदेवास पकडले. त्यानंतर मंडपातील उपस्थितांना बालविवाह प्रतिबंध कायद्याबाबत जनजागृती करण्यात आली.

पीडित मुलीने दिलेल्या माहितीनुसार तिचा विवाह इरफान बेग अन्सार बेग (वय २४, रा. माळपुरी) याच्यासोबत लावण्यात आल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी मुलगी, तिचे पालक, नवरदेव व त्याचे पालक तसेच इतर नातेवाईकांना ताब्यात घेऊन पिंपळनेर पोलीस ठाण्यात बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ च्या कलम ९, १०, ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात एकूण १० आरोपींसह १५ ते २० वऱ्हाडी मंडळींचाही समावेश आहे. दरम्यान, याच दिवशी जोला (ता. केज) येथेही अशाच प्रकारच्या बालविवाहाची माहिती मिळाल्याने पथकाने तात्काळ धाव घेत मुलगी व तिच्या पालकांना ताब्यात घेतले. नवरदेव श्रीकांत जाधव व त्याच्या कुटुंबीयांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यापूर्वी दि. १८ एप्रिल रोजी सोनगाव (ता. जि. बीड) येथे १५ वर्षीय मुलीचा बालविवाह रोखून बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात संबंधितांवर कारवाई करण्यात आली होती.

अशा प्रकारे एका हप्त्यात तीन बालविवाह प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून, मागील चार महिन्यांत AHTU बीडने एकूण सात प्रकरणांमध्ये कारवाई केली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत झडख पल्लवी जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मीरा रेडेकर, उषा चौरे, पोलीस हवालदार शोभा जाधव, प्रदीप येवले, अशोक शिंदे तसेच चालक भाऊसाहेब जाधव व अक्षय जाधव यांनी सहभाग घेतला. जिल्ह्यात बालविवाह विषयी माहिती द्यावी असे आवाहन झडख पल्लवी जाधव यांनी केले आहे.